# <u>अर्ज निशाणी क्रमांक ७७ खालील आदेश</u>

**( पारीत केलेला दिनांक १६.०१.२०२५ )**

०१. प्रस्तूतचा अर्ज धनकोने दरखास्तीमध्ये दुरुस्ती करण्याकरीता आदेश ०६ नियम १७ सी.पी.सी. प्रमाणे दाखल केला आहे.

०२. धनकोचे कथन असे की, प्रस्तूत प्रकरणात लक्ष्मीबाई यांनी ऋणको क्र. १ विरुध्द ताबा मिळणेकरिता दाखल केला आहे. दावा न्यायप्रविष्ठ असताना लक्ष्मीबाई ही दिनांक २५.०१.२०२१ रोजी मयत झाली. त्यानंतर तिचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दि.मु.नं. ३५७/१९८१ मध्ये निशाणी १८८ प्रमाणे अर्ज दाखल केला व त्याप्रमाणे दावा दुरुस्त करण्यात आला. प्रस्तूत दावा दिनांक ०१.०९.२०२२ रोजी अंशतः मंजूर करण्यात आला व मौजे किल्लारी येथील सर्वे नं. १५५/क क्षेत्र ३ एकर ६ गुंठे प्रतिवादी/ऋणको क्र. १ यांनी वादीस ६० दिवसांचे आत द्यावा असा आदेश पारीत झला. परंतू ऋणकोने साठ दिवसांच्या आत वादीस ताबा परत दिला नाही. लक्ष्मीबाई हिचे वारस भीमाशंकर इराप्पा बिराजदार व चंद्रकला पंडित चौगुले यांनी मीनाबाई राजेंद्र झाडे यांना ताबा मिळणेकरिता दरखास्त दाखल करण्याची व त्यावर सही करण्यास व समाविष्ट होण्याची विनंती केली, परंतू तिने स्पष्ट नकार दिल्यामुळे प्रस्तूत दरखास्तीमध्ये तिला ऋणको क्र. २ म्हणून समाविष्ट करण्यात आला. मीनाबाई ही मुळ दाव्यात धनकोसोबत व मयत लक्ष्मीबाईची वारस असल्यामुळे तिला धनको क्र. १/३ म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदर दरखास्तीमध्ये धनकोने ऋणको क्र. १ कडून ताब्याची मागणी केली आहे. त्यामुळे दुरुस्तीमध्ये दरखास्तीच्या स्वरुपात बदल होणार नाही. सबब दरखास्तीमध्ये ऋणको क्र. २ चे नाव कमी करुन त्याऐवजी धनको क्र. १/३ मीनाबाई राजेंद्र झाडे अशी दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

०३. ऋणको क्र. २ ने म्हणणे दाखल करुन कथन केले की, सदर प्रकरणात तिने धनको म्हणून समाविष्ट होण्यास नकार दिलेला नाही. तसेच अर्जात खोटे कारण नमुद केले आहे. सबब योग्य तो आदेश पारीत व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकला.

०५. मुळ दाव्यात मीनाबाई राजेंद्र झाडे हि मुळ वादी लक्ष्मीबाई हिची वारस म्हणून वादी गटात समाविष्ट आहे. प्रस्तूत दरखास्तीमध्ये तिला ऋणको क्र. २ म्हणून समाविष्ट केलेले आहे. सदर अर्जाद्वारे धनकोने, दरखास्तीमध्ये मीनाबाई हिस ऋणको क्र. २ म्हणून नाव कमी करुन धनको क्र. १/३ म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या अथवा दरखास्तीच्या स्वरुपात बदल होत नसल्याचे दिसून येते. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. धनकोचा दुरुस्ती अर्ज **नि.क्र.७७** खर्च रक्कम रुपये ३००/- मीनाबाई राजेंद्र झाडे यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदारास दरखास्तीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.01.17 11:16:57 +0530

**(श्री. आवटे पी. पी. )**

**दिनांक :- १६.०१.२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :- औसा.** **जिल्हा लातूर.**